# दिपोत्सव २०२०

साप्ताहिक

# बेरार टाईम्स

वर्ष -९ | गोंदिया | अंक ४८ | आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | बुधवार, दि.११ नोव्हेंबर २०२० | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2019-2021


## माओवाद्यांवर नजर ठेवण्यासाठी बालाघाटमध्ये सीआरपीएफची तुकडी

**गोंदिया:** महाराष्ट्र लगत असलेल्या मध्य प्रदेशातील बालाघाट, मंडला व सिवनी जिल्ह्यात माओवाद्यांचा वावर वाढला आहे. कान्हा केसरी व्याघ्र प्रकल्पाच्या भागात सध्याघडीला माओवाद्यांच्या हालचाली दिसून येत आहे. तीन दिवसापुर्वी झालेल्या चकमकीत एक महिला माओवादी ठार झाली. या पार्श्वभुमीवर माओवाद्यांच्या नियंत्रणासाठी केंद्र सरकारकडून लवकरच केंद्रीय रिझर्व्ह बटालियन (सीआरपीएफ) तैनात करण्यात येणार आहे.



मध्य प्रदेशातील बालाघाट आणि मंडला जिल्ह्यातील कान्हा जंगलातून माओवादी छत्तीसगड राज्यातून प्रवास करुन येतात. माओवाद्यांनी या भागात आपले प्रस्थ वाढविण्याच्या हालचाली सुरु केल्या आहेत.

जंगलाच्या मार्गाने गावात पोहोचून गावकऱ्यांशी बैठक घेतात. त्यांना बंदुकीचा धाक दाखवितात. पाहिजे ते साहित्य जबरस्तीने गोळा करतात. नागरिकांच्या माध्यमातून पोलिसांना लक्ष्य करण्याचा सतत प्रयत्न करीत आहेत. त्याचबरोबर ग्रामस्थांनाही सतत त्राद देण्यास सुरुवात केली आहे.

या परिसरात माओवाद्यांची वाढती संख्या बघून त्यांच्यावर नजर ठेवण्यास त्यांच्या हालचाली उधळून लावण्यासाठी बालाघाटसह मंडला जिल्ह्यातील माओवादग्रस्त भागात लवकरच केंद्रीय राखीव दलाची तुकडी मिळणार आहे. असे बालाघाट-मंडला विभागाचे पोलीस महानिरीक्षक के.पी. व्यंकटेश्वर राव यांनी सांगितले. माओवादग्रस्त बालाघाट आणि मंडला जिल्ह्यातील बस्तरमधील माओवादी कबीरधार ते भोरामदेव अभयारण्यापर्यंत दलमचा विस्तार करण्यासाठी सतत प्रयत्न करीत आहेत. त्याचवेळी पोलीस सतत शोध मोहीम राबवून गावकऱ्यांशी संवास साधत माओवाद्यांना रोखण्याचा प्रयत्न करीत आहे. आता माओवाद्यांच्या संपूर्ण बिमोडसाठी केंद्रीय राखीव दलाची आणखी एक तुकडी मिळणार आहे. १५०० सैनिकांची अतिरिक्त संख्या उपलब्ध राहणार आहे.

### परिक्षेत्रात कार्यरत माओवादी संघटन


या भागात तांडा दलम, मलाजखंड दलम, परसवाडा दलम, कान्हा-भोसा दलम, केबी विभाग, विस्तार दलम, खटिया-मोचा दल, देवरी-कुरखेडा दलम यासह इतर दलमच्या माध्यमातून माओवादी ग्रामीण भागात शिरण्याचा प्रयत्न सातत्याने करीत आहेत.

### कान्हा जंगलात हालचाली वाढल्या

छत्तीसगड राज्यातून येऊन माओवादी कान्हा केसरी व्याघ्र प्रकल्पाच्या भागात सध्या आपले प्रसथ निर्माण करण्याच्या प्रयत्नात आहे. अलीकडे या भागात माओवाद्यांच्या हालचाली दिसून येत आहे. ६ नोव्हेंबरला कान्हा बफर क्षेत्रात मालखेडी गावात पोलीस आणि माओवाद्यांची चकमक झाली.
















page 49.indd 1 11/12/2020, 3:32 PM

## संपादकीय

### पर्यावरण पुरक दिवाळीची गरज

दिवाळी म्हणजे दीपोत्सव, दिव्यांचा सण, पणत्या, आकाशदिवे, रंगीबेरंगी दिव्यांच्या माळा, मिठाई आणि फराळाची देवाण-घेवाण, आनंदाचे उधाण, जुने मतभेद हेवेदावे विसरून एकमेकांना आनंदाने भेटण्याचे दिवस, नातेवाईक, भाऊ-बहीण यांच्या भेटीचा सण आणि त्याचबरोबर मुलांचा उत्साह, आनंद म्हणजे फटाके! फटाक्यांची आतषबाजी, धूमधडाका. रात्र झाली की हवेत उडणा-या रंगीबेरंगी फटाक्यांनी आसमंत उजळून निघतो. फटाक्यांच्या धूमधडाक्याने परिसर व्यापून जातो. मुलांच्या उत्साहाला आणि मोठ?ांच्या अतिउत्साहाला उधाण येते. वर्षभरात येणा-या सणांत दिवाळी सणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. या सणाचा थाटमाट पाहिला तर दिवाळीला सणांची महाराणी म्हणणेच योग्य ठरेल. दिवाळी ही महाराणी म्हणूनच तिचा थाटमाट मोठा असतो आणि ती येतेही अखंड दिव्यांच्या झगमगाटात आणि फटाक्यांच्या आतषबाजीत. आता फटाक्यांचा अतिरेक व्हायला लागला म्हणून प्रदूषणाचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. सणाचा आनंद स्वत:पुरता उपभोगावा की त्यात सर्वांना सहभागी करून घ्यायचे याबाबत आपली मते पक्की ठरली की सणाचा आनंद निश्चितच वाढतो. म्हणूनच येथे आपण फक्त कमी आवाजाचे आणि शोभेचे फटाके गृहीत धरू या. शोभेचे फटाके अर्थात फुलबाजे, अनार, भुईचक्र यांच्या प्रकाशात लहान मुलांचे चेहरे किती उजळून निघतात. त्या नितळ चेह-यावरचा आनंद पाहताना आपणही आनंदी होतो. आनंद देणे आणि आनंद मिळविणे हीच या सणाची महती आहे. म्हणूनच दिवा अर्थात दीप हे या सणाचे प्रतीक आहे. दिवा दरवाजात तेवत राहिला तर घराचे प्रवेशद्वार उजळते. ज्याच्या घराचे प्रवेशद्वार मंगलमय तेथून हमखास लक्ष्मीचा प्रवेश होतोच. मात्र त्याचवेळी जर कानाचे पडदे फाडणा-या आणि घर हादरवणा-या मोठ?ा फटाक्याचा धमाकेदार आवाज झाला तर मात्र दचकून लक्ष्मी आल्या पावली परत जाण्याची शक्यता असते. म्हणून आत्मभान आणि सामाजिक भान ठेवून दिवाळीचा सण साजरा केला तर आनंद अधिक द्विगुणित होईल.

हेच फटाके ध्वनी आणि वायुपदूषणाला कारणीभूत ठरत असतात याकडे मात्र आपले लक्ष नसते किंवा असून सुद्धा त्याकडे कानाडोळा केला जातो. फटाक्यांच्या आवाजाने ध्वनिपदूषण तर होतेच, परंतु फटाक्यांच्या धुरामुळे हवेच्या पदूषणाचा स्तरही वाढतच जातो. यामुळे घशाचे आणि फुप्फुसाचे आजार वाढतात, वृद्धांना ध्वनी आणि वायुपदूषणाचा भयंकर त्रास होतो, लहान मुले, नवजात अर्भके, गरोदर स्त्रिया यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. याच पार्श्वभूमीवर दिल्लीत सर्वोच्च न्यायालयाने फटाके विकण्यास बंदी केली आहे. दिल्ली आणि राष्ट्रीय राजधानी परीक्षेत्रात (एनसीआर) फटाक्यांच्या विक्रीवर बंदी घालण्यात आली आहे. कोरोनाचा संसर्ग पाहता तो थांबविण्यासाठी आणि प्रदुर्षणावर आळा घालण्यासाठी महाराष्ट्र सरकारने दिवाळीमध्ये फटाके फोडण्यावर बंदी घालण्यात आली आहे.

# दीपपर्व; आनंदाची पर्वणी

भारतासह विदेशातही दिवाळीचा सण मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. गरीब श्रीमंत असा भेदभाव न करता सर्वजण आपापल्या परीने दिवाळी पर्वाचा आनंद लुटतात. हिंदुसंस्कृतीतील सर्वांत मोठा सण म्हणूनही दीपोत्सवाला महत्त्व आहे. प्रत्येकाच्या अंगणात तिमिराला घालवून प्रकाशकिरणे पसरविणारा हा सण. अंधाराकडून उजेडाकडे नेणारी ही दिवाळी प्रत्येकाच्या मनात घरात मांगल्य घडविणारी असते. अशा या दिवाळीनिमित्त सर्वांना मनापासून हार्दिक शुभेच्छा.

देशभर दिवाळी साजरी करण्याच्या वेगवेगळ्या प्रथा-तऱ्हा आहेत. धनत्रयोदशीपासून सुरू होणारी दिवाळी नरकचतुर्थीच्या दिवशी आपल्यातील नरकरुपी पाप, अहंकाराचे उच्चाटन केले जाते. लक्ष्मीपुजनासोबतच ग्रामीण भागातील महत्त्वाचा दिवस म्हणजे बलीप्रतिपदेचा. शेतकरी आपल्या राजा बळीराजाची पूजा अर्चना मोठ्या भक्तिभावाने करतात. अशा या मांगल्याचे प्रतीक असलेल्या दिवाळीच्या निमित्ताने माणसातील प्रकाशतत्वाचे प्रफुल्ल प्रक्षेपण अनुभवता येते. राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने देखील या सणाचे माहात्म्य आहे.

दिव्यांचे वैविध्यपूर्ण आणि कलात्मक प्रकार आहेत. त्यांचे सांस्कृतिक स्थान मात्र अनन्यसाधारण आहे. ज्योती अनेक पण प्रकाशतत्व एकच. शरीर म्हणजे पणती व त्यातील ज्योत म्हणजे प्राण, असे थोर संत सांगून गेले.

संतांच्या दृष्टिकोनातून स्वतःला अंतर्मुख करून टाकणारे हे प्रकाशपर्व आहे. हे प्रकाशपर्व शेतकरी, कष्टकरी, गरीब, श्रीमंत सर्वांच्या अंगणात आले आहे. प्रत्येक जण आपल्या लायकीप्रमाणे हा सण साजरा करीत असतो. पण या सणात दरवळणारा सुगंधतत्व मात्र एकच आहे.

पूर्व विदर्भातील गोंदिया-भंडारा हे जिल्हे धानपिकाचे.

सध्या कापणीचा हंगाम सुरू असला निसर्गाने मात्र आपला कोप दाखविला आहे. यामुळे या दिवाळीला हातात आलेले पीक मात्र अडचणीत सापडले आहे. तरी निसर्गापुढे काही चालत नाही. या नियतीला सामोरे जाऊन आपल्या परीने तो प्रकाशपर्व साजरा करण्यासाठी अंधारातून दिव्यांच्या उजेडात प्रकाशपर्वाच्या स्वागतासाठी प्रत्येक जण मात्र सज्ज झाला आहे. दीन दुबळ्यांसह सर्वांची दिवाळी दीपोत्सवाच्या उजेडाने न्हाऊन निघावी हीच अपेक्षा.

६ वर्षापासून जनतेच्या वाचकांच्या सेवेत भंडारा-गोंदिया जिल्ह्यात हिंदी भाषिकांची मोठी संख्या असतांनाही मराठीची अस्मिता टिकवून ठेवत निर्भिड, जनसामान्यांचे व्यासपीठ म्हणून बेरार टाईम्सने आपली जागा कायम केली आहे.

वाचक, जाहिरादार व वितरक तसेच हितचिंतकांच्या प्रेमापोटी दिपोत्सव विषेशांक २०१४ साकारु शकलो आहे. या दिपोत्सवाच्या निमित्ताने जिल्ह्यातील बेरार टाईम्सचे हिंतचिंतक, वाचक जाहिरातदार, प्रतिनिधी वितरक व जनतेला दिवाळीच्या

हार्दिक शुभेच्छा.

बळीराजा बळ दे..
गौतम बुद्धा, बुद्धी दे..
जिजाऊ माते प्रेरणा दे..
शिवराया युक्ती दे..
तुकोबाराया ज्ञान दे..
शंभूराजा शक्ती दे..
उमाजीराजा शौर्य दे..
ज्योतिबा त्यागाची भावना दे..
सावित्रीमाई संयम दे..
भीमराया शिक्षणाची आस दे..
शाहूराजा तळमळ दे..
अण्णा भाऊ लेखणी दे..
अहिल्यामाई जनसेवेची इच्छा दे..
इडा-पीडा टळू दे, बळीचे राज्य येवू दे..

खेमेंद्र कटरे-मुख्य संपादक
सुरेश भदाडे-सहयोगी संपादक

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करून डोलारे एजन्सीजवळ चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# ओबीसी आरक्षण बचावासाठी रस्त्यावरच्या लढाईची गरज



**मुंबई,:** ङ्गमराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देऊ नये. तसं केल्यास रस्त्यावरील लढाई अधिक तीव्र करु, असा इशारा ओबीसी समाजाकडून राज्य सरकारला देण्यात आलाय. मुंबईतील मराठी पत्रकार संघात ओबीसी समाजाची गोलमेज परिषद पार पडली. या गोलमेज परिषदेत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी एक पत्र लिहिण्यात आले. मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्याची मागणी करणाऱ्या आमदार संजय शिंदे यांचा निषेध व्यक्त करण्यात आला.तसेच येत्या ७ डिसेंबरला राज्यातील सर्व ३५ ओबीसी संघटनांच्यावतीने ओबीसी जनमोर्चा अधिवेशनादरम्यान काढण्याचा निर्णय घेण्यात आला.त्यासोबतच येत्या २६ नोव्हेंबरला राज्यात पाटी लावा ओबीसी जनगणना करा या मोहीमेंतर्गत राज्यस्तरीय आंदोलनात तहसिलदार व जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्याचे ठरविण्यात आले.

सध्याच्या घडीला राज्यामध्ये ज्या पद्धतीने आरक्षणाच्या मुद्याला घेऊन गदारोळ सुरु झालेला आहे.त्या परिस्थितीमध्ये आपल्या संविधानिक अधिकारासाठी येत्या काळामध्ये ओबीसी समाजाने रस्त्यावर उतरून आरक्षण बचावाची भूमिका घेतल्याशिवाय पर्याय नसल्याचे विचार ज्योती क्रांती परिषदेचे प्रदेशाध्यक्ष रमेश बारसकर यांनी व्यक्त केले.ते मुंबई येथील मराठी पत्रकार भवनात ओबीसी व्हीजेएनटी संघर्ष समितीच्यावतीने आयोजित राज्यस्तरीय ओबीसी गोलमेज परिषदेत बोलत होते.मुंबई मराठी पत्रकार संघात पार पडलेल्या गोलमेज परिषदेत ओबीसी समाजाचे अनेक नेते उपस्थित होते. मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण दिल्यास संपूर्ण ओबीसी समाज रस्त्यावर उतरुन लढाई अधिक तीव्र करेल असा इशारा यावेळी देण्यात आला. विधानसभेने राज्यातील जनमताचा आदर करुन सन २०२१ ची सार्वत्रिक जनगणना जातनिहाय करावी असा ठराव मंजूर करण्यात आला होता. तरीही केंद्र सरकार जातनिहाय जनगणना करणार नसेल तर महाराष्ट्र सरकारने तशी जनगणना करावी, अशी मागणी ओबीसी गोलमेज परिषदेचे अध्यक्ष प्रकाश शेंडगे यांनी केली आहे.



पुढे बोलतांना बारसकर म्हणाले की,जे आमदार,खासदारासह स्थानिक लोकप्रतिनिधी ओबीसी आरक्षणाच्या विरोधात भूमिका घेतील त्यांना निवडणुकीत मतदान करण्यापासून जागृत ओबीसींनी टाळले पाहिजे तसेच इतरानाही आवाहन केले पाहिजे अशी रोखठोक भूमिका मांडली.तसेच ही परिवर्तनाची चळवळ असून कुणी स्वार्थासाठी किंवा राजकीय लाभासाठी काम करीत असेल तर त्यावरही विचामंथन करुन त्यांनाही समज द्यावे लागेल असे म्हणत ओबीसीतील सर्वच जातींना सोबत घेतल्याशिवाय चळवळच नव्हे तर आंदोलनही यशस्वी होणार नसल्याचे विचार मांडले. मंचावर ओबीसी व्हीजेएनटी संघर्ष समितीचे प्रमुख माजी आमदार प्रकाश अण्णा शेंडगे,बापट आयोगाचे सदस्य लक्ष्मण गायकवाड,बाळासाहेब सानप,मच्छिंद्र कांबळे,रेणूका येणके,भारतीय पिछडा (ओबीसी) शोषित संघटनेचे राज्यअध्यक्ष ज्ञानेश्वर गोबरे,ओबीसी सेवा संघाचे अध्यक्ष इंजि.प्रदिप ढोबळे, राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष डॉ.बबनराव तायवाडे,बीपीएससचे प्रा.रमेश पिसे,विलास काळे,एड.अंजली साळवे,सचिन राजुरकर,बबलू कटरे,अशोक जिवतोडे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

### ओबीसी गोलमेज परिषदेच्या महत्वाच्या मागण्या

- मराठा समाजाचे ओबीसीकरण करूनये. कोणत्याही परिस्थितीत ओबीसी या प्रवर्गात मराठा जातीचा समावेश होऊ नये.
- सन १९३१च्या जनगणनेनुसार देशात ओबीसी समाज ५२ टक्के आहे. त्यामुळे ५२ टक्के ओबीसींना ५२ टक्के आरक्षण देण्यात यावे.
- पुढे ढकलण्यात आलेल्या चझडउच्या परीक्षा कोणत्यागी दबावाला बळी न पडता लवकरात लवकर घेण्यात यावी.
- इयत्ता ११वीची प्रवेश प्रक्रिया विनाविलंब सुरुकरण्यात यावी.
- शासकीय सेवांमधील ओबीसींचा अनुशेष लवकरात लवकर भरण्यात यावा.
- कोणत्याही कारणास्तव मेगाभरती न थांबवता ती ताबडतोब करण्यात यावी. तत्पूवी दिनांक २२ ऑगस्ट २०१९ रोजी बिंदूनामवलीला दिलेली स्थगिती तत्काळ उठवण्यात यावी.
- ओबीसींच्या महाज्योती या संस्थेसाठी १००० कोटी रुपयांची तरतूद करण्यात यावी. संस्थेच्या कामाला शिघ्रगती प्राप्त होण्यासाठी ज्योतीदूतांची नेमणूक तातडीने करण्यात यावी.
- महाज्योतीला स्वायत्त संस्थेचा दर्जा देण्यात यावा. एससी एसटी प्रमाणे सर्वच अभ्यासक्रमांसाठी १०० टक्के शिष्यवृत्ती लागू करण्यात यावी.
- ओबीसी समाजाची अनेक वर्षे थकीत शिष्यवृत्ती तत्काळ त्यांच्या खात्यावर जमा करण्यात यावी.
- शासकीय सेवेतील ओबीसी कर्मचा?यांना पदोन्नतीत आरक्षण लागू करावे.
- ओबीसी समाजाच्या गोलमेज परिषदेत वरील मागण्यांसह आणखी १५ मागण्यांचा ठराव आज पास करण्यात आला. सरकारने ओबीसी समाजाच्या या मागण्या तात्काळ मान्य कराव्या अशी मागणी ओबीसी गोलमेज परिषदेकडून करण्यात आली आहे.

# ओबीसींनी रणांगणात उतरणे अत्यंत गरजेचे-ॲड.धनराज वंजारी







**नागपूर:** सध्या देशासह राज्यातही विविध समस्या कायम असून त्या सोडविण्याकरिता केंद्र व राज्य सरकार फारसे प्रयत्न करत असताना दिसत नाही. गेल्या कित्येक वर्षापासून ओबीसींची जात निहाय जनगणना रखडली आहे. ती जनगणना शासनाने तात्काळ करावी. तसेच दुदैवाने प्रबळ मराठा समाज ओबीसीमध्ये आरक्षणाच्या मागणीकरिता सर्व शक्तीनिशी प्रयत्न करीत आहे. त्यामुळे राज्यातील समस्त ओबीसी, वीजेएनटी, बारा बलुतेदार समाज आस्वस्थ असून गेली २ वर्ष न्यायाची लढाई वेगवेगळ्या टप्पावर लढत आहे. ओबीसी समाजाने आपल्या संविधानिक न्याय हक्कासाठी रणांगणात उतरल्या शिवाय त्यांना आपले हक्क मिळवता येणार नाही. असे प्रखर मत वंचित बहूजन आघाडीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष ॲड. धनराज वंजारी यांनी व्यक्त केले.

भारतीय पिछडा (ओबीसी) शोषित संगठना द्वारा ओबीसी रणांगण परिषद रविवार (दि.१)ला नागपूर येथील महाराष्ट्र् प्रदेश कार्यालयता पार पडली. त्याप्रसंगी ॲड. धनराज वंजारी यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून वरील मत मांडले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा.डॉ. ज्ञानेश्वर गोरे, प्रदेशाध्यक्ष बीपीएसएस महाराष्ट्र यांनी स्थान भूषविले. व सभेला मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे उद्घाटक कृष्णाजी बेले, जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते यांनी सभेला मार्गदर्शन केले. प्रास्ताविकेच्या माध्यमातून प्रा.ॲड. रमेश पिसे यांनी परिषदेच्या आयोजनाची गरज व पुढील कार्यक्रम यावर प्रकाश टाकला. ॲड. अंजली साबळे, विलास काळे, सुनिता काळे, वंदना बनकर, माजी खासदार खुशाल बोपचे, खेमेंद्र कटरे, बी.के. हेडाऊ, संजय हेडाऊ, संजय शेंडे, शुभांगी घाटोळे, विनायक वाघ, शकील अहमद, प्रा. शरद वानखेडे, उमेश कोराम, ॲड. रामकृष्ण सांभारे, सुषमा भड, सरफरात भाई, मनोज चव्हाण, एस.यू.वंजारी, यांनीही ओबीसींच्या विविध समस्यांवर प्रकाश टाकला. ओबीसी, एससी, एसटी व अल्पसंख्याक समाज यांच्या न्याय मागण्या त्वरित मान्य न केल्यास आंदोलनाची धार अधिक तीव्र करण्यात येईल असा इशारा याप्रसंगी शासनकर्त्यांना देण्यात आला.

२६ नोव्हेंबरला संविधान दिनानिमित्त ओबीसींचा जागर पुकारण्यात आला आहे. तसेच ७ डिसेंबर २०२० रोजी नागपूर येथे सुरु होणाऱ्या महाराष्ट्र विधीमंडळ अधिवेशनाच्या वेळी विधान सभेला घेराव करण्याचा निर्धार परिषदेत व्यक्त करण्यात आला. संचालन विलास काळे यांनी केले. आभार लक्ष्मीकांत लोळगे यांनी मानले.

यावेळी ॲड. अनिल बांगळकर, राठोड, डॉ. विजय चाफले, मनोज चव्हाण, वामनराव नखाते, मोहबे, विलास शेंडे, कैलास डफ, वसंता शेंखवरे, संजय शेंडे, प्रा. नितीन पडोळे, माधुरी सेलोकर, हरीकिशन दादा हटवार, पुरुषोत्तम कामडी, फुलसर सतीबावणे, भास्कर पाटील, विजय दुररतकर, दिनकराव वाढोरे, श्याम पाटमासे, प्रेम महेशकर, सुनील लोखंडे आदि उपस्थित होते.

**थेट मनापासून..!**
**दोस्तहो..!**
**यंदाची दिवाळी..**
**ज्यांच्या घरात अंधार असेल**
**त्यांच्या घरापर्यंत जावी**
**ज्यांच्या मनात अंधार असेल**
**त्यांच्या मनापर्यंत जावी**
**अंधारालाही**
**प्रकाशाची फुलं यावी !**
**तुम्ही**
**आम्ही**
**सारेच..**
**मनापासून**
**तसे प्रयत्न करूया..!**
**नुसत्याच**
**वरवर शुभेच्छा देण्याची**
**नाटकं**
**आता नकोत !**

**ज्ञानेश वाकुडकर**
**नागपूर**

# द्विशतकाकडे झेपावणारी मराठी रंगभूमी

५ नोव्हेंबर १८४३ रोजी सांगली येथे कै. विष्णूदास भावे यांनी "सीता स्वयंवर' या आख्यानवजा मराठी संगीत नाटकाची सुरुवात केली. सांगलीच्या अधिपतींनी दिलेल्या आदेशानुसार हा नाट्य प्रयोग साकारण्यात आला होता. हा प्रयोग पूर्वीच्या नाट्य प्रकारापेक्षा सर्वच दृष्टिने आधुनिक कलात्मक व सुसंस्कारित असा होता. या प्रयोगामुळे विष्णूदास भावे यांना आधुनिक मराठी रंगभूमीचे जनक म्हटले जाते. याचे महत्त्व आणि औचित्य जपण्यासाठी आपण दरवर्षी ५ नोव्हेंबर रोजी मराठी रंगभूमी दिन साजरा करतो. आज जवळपास १७७ वर्षाची ही ऐतिहासिक घटना तमाम मराठी रंगकर्मीसाठी एखाद्या सणासारखीच आहे. दरम्यानच्या काळात मराठी रंगभूमीवर बरीच स्थित्यंतरे घडली. त्यास सामोरे जात मराठी रंगभूमीने मोठी झेप घेतली. त्याचा थोडक्यात आढावा.

प्राचीन किंवा अर्वाचीन युरोप खंडातील कोणत्याही राष्ट्रात जेवढी नाट्यरुपी ग्रंथसंपदा दिसते. तेवढी ती भारतात देखील आहे. यावरुन भारतीय नाट्यशाखा निश्चितच समृद्ध होती, हे आपल्या लक्षात येते. अगदी आधुनिक मराठी रंगभूमीचा इतिहास पाहिला तरी आपल्या लक्षात येते की, मराठी रंगभूमीला १७७ वर्षांची द्विशतकाकडे झेपावणारी भरभक्कम परंपरा आहे. ५ नोव्हेंबर १८४३ पासून २०२० पर्यंतच्या १७७ वर्षांच्या कालखंडाचे १८४३ ते १९५० अशी १०७ वर्षे व १९५० ते २०२० अशी ७० वर्षे असे दोन विभाग करून त्याचा आढावा घेतला असता हे स्पष्ट की, या दोन्ही काळातील प्रत्येक दशकामध्ये मराठी रंगभूमी प्रगत व अधिकाधिक समृद्ध होत गेली आहे.

सुरुवातीच्या शतकी कालखंडात किलीस्कर, देवल, श्री.कृ.कोल्हटकर, खाडिलकर, वरेरकर, शं.प. जोशी, वीर वामनराव जोशी, शुक्ल यांनी पौराणिक, सामाजिक विषय आपल्या नाटकांतून हाताळले. १९३० नंतर महाराष्ट्रात रंगभूमीवरील नाट्य प्रयोगामध्ये नावीन्य निर्माण झाले. तसे पाहता रंगभूमीवरील प्रयोगाच्या बाबतीत नाविन्य निर्माण करुन रंगभूमी वास्तववादी करण्याचे काम वरेरकरांनी १९३० पूर्वीच केले होते.

या दरम्यान ३ मे १९१३ ला राजा हरिश्चंद्र हा मूकपट आणि १४ मार्च १९३१ ला ङ्गआलम आराफ हा पहिला बोलपट आला. सहाजिकच नाटकातील कलावंत मंडळी या नव्या क्षेत्राकडे वळली. बोलपटाचे नवयुग सुरु झाले. तरीही १९३३ च्या आसपास काही मंडळी काहीतरी वेगळे करण्याचा मानस करुन कामाला लागली. यात वर्तक, काणेकर, आतळेकर आदींचा समावेश होता. आचार्य अत्रे यांनीही आपल्या नाटकातून वेगळेपण दाखवले. तसेच मो.ग.रांगणेकर यांनी ङ्गकुलवधू या आपल्या नाटकारद्वारे एक वेगळा प्रयत्न केला. या दरम्यान तात्यासाहेबांच्या म्हणजे वि.वा. शिरवाडकरांच्या आगमनाने नाट्यसृष्टीला चैतन्य लाभले. १९४३ मध्ये सांगली येथे शतसांवत्सरिक रंगभूमीचा सोहळा झाला. या सोहळयाने रंगभूमीला प्रेरणा, उर्जा, नवतेज दिले. स्वातंर्त्यपूर्वीच्या काळात महाराष्ट्रात नाटकाचा उपयोग स्वराज्याच्या आंदोलनासाठी करण्यात आला. हे आंदोलन अधिक तीव्र कसे होईल. लोकजागृती कशी होईल, यासाठी नाटकाचा वापर झाला. स्वातंर्त्याची ज्योत नाटकाद्वारे संपूर्ण महाराष्ट्रात पसरवण्याचा प्रयत्न झाला.



### स्वातंत्र्योत्तर रंगभूमी

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आपल्या देशातील नाट्यकला चौफेर वाढली. या कलेला सरकारने तसचे नाट्य रसिकांनी आश्रय दिला, प्रोत्साहन दिले. स्वातंर्त्यानंतरच्या पुढील सहा दशकांत मराठी रंगभूमीवरील अनेक प्रकारचे बदल झाले. प्रयोगही झाले त्यामुळे स्वातंर्त्यानंतरच्या मराठी रंगभूमीचा विचार करताना या काळातील लेखकांनी केलेल्या विविध प्रयोगांचा विचार करणे महत्वाचे ठरते.

महत्त्वाचे म्हणजे या १९५० ते १९७० या काळातील नाटककांरांनी थोडेसे धाडस दाखवून पूर्वीच्या काळातील पौराणिक, सामाजिक, राजकीय विषयांचा आक्रास्तळेपणा नष्ट केला. नाट्य रसिकांना निखळ मनोरंजन दिले. या कालावधीत लेखकांनी चौफेर लेखन केले ते एकाच प्रवाहात अडकले नाहीत. या काळात व्यावसायिक, प्रायोगिक लोकरंगभूमी, बालरंगभूमी एकांकिका अशा सर्वच नाट्य प्रकारांचे लेखन झाले. व्यावसायिक नाटकासोबत प्रायोगिक, समांतर नाटक होऊ लागली. वि.वा.शिरवाडकर, पु.ल. देशपांडे, विजय तेंडुलकर, वसंत कानेटकर, पु.भा.भावे, गो.नि. दांडेकर, बाळ कोल्हटकर,, रत्नाकर मतकरी, विद्याधर गोखले, पुरुषोत्तम दारव्हेकर यांनी या काळात विपुल लेखन केले आणि मराठी रंगभूमीला समृद्धी दिली.

### वादळी कालखंड

१९७० ते ८० या दशकात मराठी रंगभूमीवर मोठी वादळं झाली. किंबहुना हा कालखंड रंगभूमीसाठी वादळी कालखंड ठरला. रंगभूमीसाठी वादळ निर्माण होणे, ही बाब काही नवी नाही. भाऊबंदकी त्याआधीचे कीचकवध या नाटकांसाठी १९१० मध्ये प्रेस ॲक्टने बळी घेतला. कीचकवधात जुलमी राज्यकर्त्यांचा वध दाखवला म्हणून ते प्रेस ?क्टच्या कहरात दगावले, भाऊबंदकीत राज्यकर्त्यांचा केवळ निषेध असल्यामुळे ते बचावले. अशी उदाहरणे आहेत. मात्र या ७० ते ८० च्या दशकात नवीन दृष्टीने विचार करावयास प्रेरित केले. वसंत कानेटकरांनी आपले अजरामर नाटक ङ्गरायगडाला जेव्हा जाग येतेफ लिहिले. तसेच तेंडुलकरांनी "घाशीराम कोतवाल' लिहून वादळ निर्माण केले. या नव्या प्रयोगाने प्रायोगिक नाटकांकडे पाहण्याची दृष्टी दिली. या काळात सखाराम बाईंडर, एक शून्य बाजीराव, महानिर्वाण, माता द्रौपदी, लोककथा, ७८ वासनाकांड, गावी, नटसम्राट, हमीदाबाईची कोठी, अलवरा डाकू, टिळक आगरकर आदी नाटके प्रेक्षकांच्या समोर आली.

तसेच या काळात मराठी रंगभूमीवर एक नवीन गोष्ट झाली ती म्हणजे मराठीतील काही नाटके परभाषेत गेली तर काही परभाषेतून मराठीत आली. प्रामुख्याने बादल सरकार, गिरीष कर्नाड, मोहन राकेश यांच्या नाट्यकृती मराठीत यांव्यात, यासाठी महाराष्ट्र तसेच केंद्र शासनानेही त्यांच्या पातळीवर बरीच मदत केली. १९८० ते १९९० या दशकातील नाटके केवळ त्या त्या दशकापुरतीच मर्यादित न राहता आजही रंगभूमीवर आपले आस्तित्व दाखवत आहेत. याचे संपूर्ण श्रेय त्या नाटककारांनाच जाते. महेश एलकुंचवार, रत्नाकर मतकरी, वि.वा .शिरवाडकर, वसंत कानेटकर, विजय तेंडुलकर, मधुकर तोरडमल, जयवंत दळवी, अशोक पाटोळे, शेखर ताम्हाणे, वसंत सबनीस, सई परांजपे, प्र.ल. मयेकर. प्रेमानंद गज्वी यांनी व्यावसायिक यश मिळविले.

२०-२५ वर्षानंतरही म्हणजे आजही यांची नाटके व्यावसायिक पातळीवर यशस्वी होताना दिसतात. तसेच प्रायोगिकतेला महत्व देऊन नवीन प्रयोग केले. पुलंचे वा?यावरची वरात, असा मी असा मी, प्र.के. अत्रेंचे तो मी नव्हेच अशी उदाहरणे सांगता येतील की ज्यांचा पगडा आजही प्रेक्षकांवर आहे. या वेगवेगळ्या लेखकांनी आपापल्या नाटकांतून विविध विषयांना हात घालत समाजाला जे पाहिजे ते लिहिले. आणि समाजमताचे प्रतिबिंब नाटकांतून आपल्या समोर उभे राहिले.

### यशस्वी प्रयोग

१९९० ते २०१० या काळात मराठी रंगभूमीची प्रगती पाहता एक संपूर्ण वेगळा लेख होऊ शकतो तरी त्यांचा थोडक्यात परामर्ष घेता झालेली नेत्रदीपक प्रगती लक्षात येते. या २० वर्षांच्या काळात अनेक नामवंत नाटकारांनी दिग्दर्शकांनी आपली वेगवेगळी शैली वापरुन रंगभूमीवर विविध प्रयोग केले. व्यावसायिक पासून ते प्रायोगिक अशा स्तरांवर नवनवीन प्रयोग या काळात पहावयास मिळाले. कोणी महानाट्य तर कोणी त्रिनाट्य तर कोणी दीर्घांक असे वेगवेगळे नाट्य प्रयोग यशस्वीरित्या साकारले. तसेच काही नाटकांनी गदारोळही केला. थेट संसदेतही याचे पडसाद उमटले होते. तसेच या दशकात दूरचित्रवाहिन्यांचे जे आगमन झाले त्यांच्या स्पर्धेत उत्तमोत्तम नाट्यनिर्मिती देखील झाली आणि प्रेक्षकांनी बऱ्याच अंशी नाटकाला पसंती दिली यासाठीचे श्रेय सर्वांनाच देणे उचित ठरेल कारण चार-दोन नावे घेतली तर ते इतरांवर अन्याय होईल.

विविध चित्रवाहिन्यांच्या स्पर्धेतही आपल्या मराठी रंगभूमीच्या प्रगतीसाठी रंगकर्मी मंडळींनी रंगभूमीची सेवा चालू ठेवली आहे. आजही अनेकविध प्रयोग होत आहेत. त्यामुळे मराठी रंगभूमीवरील चैतन्य टिकून आहे. केवळ व्यावसायिक दृष्किोन न ठेवता सर्व बाजूंनी रंगभूमीची प्रगती होण्यासाठी ही रंगकर्मी मंडळी झटत आहे. ही आशादायी बाब आहे. ५ नोव्हेंबर १८४३ रोजी सांगली येथे कै. विष्णूदास भावे यांनी सीता स्वयंवर या आख्यानावर आधारित नाट्य प्रयोग करुन मराठी रंगभूमीचे बीज रोवले. या बिजाचा आता बहुविशाल असा वटवृक्ष झाला असून त्याच्या शाखा सर्वत्र पसरलेल्या आहेत. त्याच्या छत्रछायेत आपण रंगकर्मी मंडळी रंगभूमीची सेवा करत आहोत. निश्चितच भारतीय संस्कृतीच्या इतिहासात आपल्या मराठी रंगभूमीचे नाव सुवर्णाक्षरात नोंदवले जाईल, असेच कार्य मराठी रंगभूमीचे आहे.

२०२० या वर्षात कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आपली रंगभूमी ठप्प झाली. कलावंतांसह तंत्रज्ञ व लहान कामगार ज्यांचे आयुष्य नाटकावर, रंगभूमीवर आहे. त्यांना मोठा फटका बसला अर्थातच जागतिक पातळीवरच कोरोनाचा कहर आहे. अशी कितीही संकटे आली तरी आमचा कलावंत, तंत्रज्ञ हा फिनिक्स पक्षासारखी परत मोठी झेप घेईल यात शंका नाही. कोरोनाने बळी घेतलेल्या जागतिक तसेच आपल्या मराठी रंगभूमीच्या दिवंगत कलाकारांना श्रद्धांजली.

**डॉ.राजू पाटोदकर मुंबई**
**(९८९२१०८३६५)**

सामाहिक बेरार टाईम्स {Z{^S}, {Zîn j bmH${à` gmám[hH$ http://berartimes.com दिपोत्सव बुधवार, दि. ११ नोव्हेंबर २०२० 3

# जिल्ह्यात एसआयटी चौकशीमुळे धान खरेदी केंद्र बंद

**देवरी:** आधारभूत हमीभाव धान खरेदी केंद्रांचा शुभारंभ केल्याची घोषणा शासन व लोकप्रतिनिधींनी केली आहे. याबाबत ठिकठिकाणी उद्घाटन सोहळेही पार पडले. परंतु शासनातर्फे एसआयटीच्या चौकशीमुळे जिल्ह्यातील जिल्हा फेडरेशन व आदिवासी विकास महामंडळातंर्गत सुरु झालेल्या आदिवासी सहकारी संस्थेचे धान खरेदी केंद्र सध्या बंदच आहेत. त्यामुळे शेतकरी व संस्था अडचणीत आले आहे. त्यामुळे शासनाने एसआयटी चौकशी शिथिल किंवा स्थगित करुन शेतक?यांना न्याय देण्याची मागणी जिल्हा आदिवासी विविध कार्यकारी सहकरी संस्थेच्या संघाने देवरी येथे आयोजित सहकारी संस्थेच्या संचालक मंडळाच्या सभेतून केली आहे.



सभेला संघाचे जिल्हाध्यक्ष शंकर मडावी, आदिवासी विकास महामंडळाचे संचालक भरतसिंग दुधनाग, जिल्हा सचिव हरीश सोहळे, संचालक प्रमोद संगीडवार, कृपाशंकर गोपाले यांच्यासह जिल्ह्यातील सर्व आदिवासी सहकारी संस्थेचे संचालक उपस्थित होते. याप्रसंगी शासनने सहकारी संस्थेवर लावलेली एसआयटी चौकशी संदर्भात चर्चा करुन शासनाच्या या कार्यवाहीबद्दल नाराजी व्यक्त करण्यात आली. जिल्ह्यात जिल्हा मार्केटिंग फेडरेशनच्या वतीने ६० व आदिवासी विकास महामंडळाच्या वतीने ४४ असे एकूण ११४ धान खरेदी केंद्रांना मंजुरी देण्यात आली आहे. या सर्व धान खरेदी केंद्रांवर मागील वर्षी २०१९-२० या हंगामात धान खरेदीत मोठा घोटाळा झाला. या संदर्भात जिल्ह्यातील अनेकांनी विधानसभा अध्यक्ष नाना पटोले यांच्याकडे तक्रार केली होती. त्या तक्रारीची दखल घेत शासनाच्या वतीने एसआयटी चौकशी लावण्यात आली. परंतु ही चौकशी शासनाने तीन महिन्यापूवी का लावली नाही, आता दिवाळीपूर्वीच ही चौकशी का लावण्यात आली असे प्रश्न उपस्थित झाले असून या चौकशीमुळे गरीब शेतकरी, संस्थेचे कर्मचारी संकटात येण्याची शक्यता नाकारता येत नाही. या चौकशीदरम्यान धान खरेदी करणा?या संस्थेचे कर्मचा?यांना सर्व दस्ताऐवज घेऊन खरेदी चौकशी समितीसमोर उपस्थित राहावे लागत आहे. त्यामुळे धान खरेदी केंद्राचे उद्घाटन होऊनसुद्धा धान खरेदी करू शकत नाही.

आठ महिन्यांच्या कोरोना काळातून आतातरी शेतक?यांना मुक्तता मिळेल, त्याचे कटुंबीय आनंदी होतील, या विचार शेतकरी होते. परंतु कोरोनानंतर आता एसआयटी चौकशीमुळे शेतकरी व संस्थेचे कर्मचारी अडचणीत आले आहेत. शेतकरी दररोज धान खरेदी केंद्राच्या चकरा मारत आहे. दिवाळी सात दिवसावर आली असल्याने हमीभाव केंद्र सुरु नसल्याने शेतकरी आपले धान नाईलाजास्तव खासगी व्यापा?यांना १२०० ते १४०० रुपये प्रति क्विंटल दराने विकत आहे. हाच दर हमीभाव केंद्रात १८६८ रुपये प्रति क्विंटल आहे. सोबत ७०० रुपये बोनससुद्धा मिळणार आहे. मात्र एसआयटी चौकशीमुळे शेतक?यांना आपले धान कवडीमोल दराने विकावे लागत आहे. एकीकडे शेतकरी सततच्या दुष्काळामुळे पूवी हवालदिल आहे. तर दुसरीकडे आता एसआयटीच्या चौकशीमुळे शेतक?यावर एकप्रकारे अन्याय होत आहे. परिणामी शेतकरी व सहकारी संस्थेचे संचालक व कमचा?यांमध्ये शासनाप्रति असंतोष व्यक्त केला जात आहे. त्यामुळे शासनाने जिल्ह्यात लावलेली एसआयटी चौकशी शिथिल करावी किंवा स्थगित करावी. अन्यथा जिल्ह्यातील कोणतीही आदिवासी सहकारी संस्था धान खरेदी करणार नाही, असा इशाराही सभेतून दिला आहे

# तांत्रिक अडचणींमुळे धान खरेदी प्रक्रिया रखडली

**गोंदिया:** जिल्ह्यात धान खरेदीत पारदर्शकता यावी व शेतकऱ्यांना तलाठी कार्यालयाच्या फेऱ्या मारण्यापासून मुक्तता मिळावी या हेतूने घातलेली डिजिटल स्वाक्षरीत सातबाऱ्याची अट आता धान खरेदीत अडथळा निर्माण करीत असून जिल्ह्यातील धान खरेदी प्रक्रिया रखडली आहे.याबाबत सविस्तर असे की, जिल्हा पणन अधिकारी गोंदिया या कार्यालयाकडून जिल्ह्यातील विविध सहकारी संस्थांना ५ दिवसांच्या आत धान खरेदी केंद्र सुरु करण्यासाठी निर्देश देण्यात आले असून शेतकऱ्यांकरीता अनेक मार्गदर्शक सूचना निर्गमीत केलेल्या आहेत. धान खरेदी केंद्रावर धान खरेदी करताना केंद्रास जोडलेल्या गावाच्या यादीनुसारच धानाची खरेदी करावी. धान खरेदी करताना शेतकऱ्यांनी त्या हंगामाचा पिकपेरा असलेल्या सातबाराचा उतारा मुळप्रत (डिजीटल स्वाक्षरीचे व त्यावर धानाखाली लागवड क्षेत्रफळ नमूद आहे असा), आधारकार्ड झेरॉक्स व बँक खाते पासबुक झेरॉक्स घेवून धान खरेदी केंद्रावर आणावे अशा अनेक अटी टाकलेल्या आहेत. सध्या जिल्ह्यात विविध सेतू केंद्रामार्फत वा कम्प्युटर कॅफेतून निघणा?या सातबाऱ्यांवर २०१८-१९ या हंगामाचाच पीक पेरा नोंदविलेला आहे. सातबा?यावर चालू हंगाम म्हणजे २०२०-२१ चा पीक पेरा नमूद असणे आवश्यक आहे. परंतु सेतू केंद्रातून कालबाह्य डिजिटल सातबारा मिळत असल्याने शेतकऱ्यांवर पुन्हा तलाठी कार्यालयाच्या चकरा मारण्याची वेळ आली आहे. सदर पीक पेरा अद्ययावत करण्यातील पहिली अडचण म्हणजे जिल्ह्यातील तलाठी संघटनेमार्फत विविध मागण्यांसाठी ९ नोव्हेंबर पासून असहकार आंदोलन पुकारण्यात आले आहे. त्यामुळे तलाठी कार्यालय बंद असणार असून तलाठ्यांना सर्व सातबारे एकाचवेळी अद्ययावत न करता प्रत्येक सातबाऱ्याचा पीक पेरा एक-एक करून अद्ययावत करावा लागणार आहे. दुसरी बाब म्हणजे, जिल्हा पणन अधिका?यांनी तलाठी स्वाक्षरीत सातबा?याऐवजी डिजिटल स्वाक्षरी धान खरेदी केंद्रावर देण्याची अट घातली आहे. यामुळे सातबाऱ्यावरील तांत्रीक बाब शेतकऱ्यांसाठी सोयीऐवजी त्यांची अडचण ठरत आहे.

**भंडाऱ्यात डिजिटल सातबाऱ्याची अट शिथिल**

सातबाऱ्यावरील चालू पीक पेरा नोंदविण्याची प्रक्रिया ही लांबलचक असून पीक पेरा अद्ययावत होईपर्यत डिजिटल स्वाक्षरीयुक्त सातबाऱ्याची अट पणन अधिकारी भंडारा यांनी शिथिल केली आहे. धान खरेदी केंद्रावर तलाठी हस्तलिखित अद्ययावत पीक पेरायुक्त सातबारे स्वीकारण्यास मुभा देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे गोंदिया जिल्ह्यात सुद्धा डिजिटल सातबाऱ्याची अट शिथिल करून हस्तलिखित सातबारे स्वीकारण्यास मुभा देण्याची मागणी गोंदिया जिल्ह्यातील शेतकरी व धान खरेदी केंद्रांनी केली आहे.

## २६ नोव्हेंबर संविधान दिनानिमित्त राज्यस्तरीय निबंध स्पर्धा

**गोंदिया-** प्रत्येक भारतीय नागरिकांमध्ये संविधान विषयक जनजागृती निर्माण करण्यासाठी, तसेच प्रत्येक भारतीय जनमनसात संविधानाचे मूल्य रुजविण्यासाठी २६ नोव्हेंबर संविधान दिनानिमित्त राज्यस्तरीय निबंध स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे. या निबंध स्पर्धकरीता प्रवेश नि:शुल्क आहे. निबंध स्पर्धेचा विषय बहुसंख्यक समाजाच्या समस्या न सुटण्यास जबाबदार कोण? संविधान की सरकारे आहे तर वरील विषयावर मराठी, हिंदी किंवा इंग्रजी कोणत्याही एका भाषेत १००० शब्द मर्यादेत निबंध लिहता येईल. विजेत्यांसाठी प्रथम ३०००/-, द्वितीय २०००/-, तृतीय १०००/- आणि उत्तेजनार्थ ५००/- रु. चे ५ पारितोषिके देण्यात येणार आहेत. सहभाग घेण्यासाठी प्रस्तुत राज्यस्तरावरील या निबंध स्पर्धेत वय १५ वर्ष ते यापेक्षा अधिक वयाचे नागरिक विद्याथी शिक्षक डॉक्टर वकील व्यावसायिक व सर्व महिला पुरुष यात सहभागी होऊ शकतात, निबंध स्पर्धेत निर्धारित केलेल्या विषयावर एक हजार शब्दांचा मराठी, हिंदी अथवा इंग्रजी निबंध लिहून पाठवणे आवश्यक आहे. सदर निबंध कोणत्याही एका भाषेत पाठवावे, निंबध परीक्षण उच्च विद्याविभूषित गणमान्य विद्वान यांच्या द्वारे केली जाईल. परीक्षकांच्या द्वारे घोषित केलेले निकाल सर्वमान्य राहतील, निबंध स्पर्धेच्या पुरस्काराचे वितरण दिनांक २६ नोव्हेंबर २०२० ला आयोजित संविधान दिनाच्या कार्यक्रमात ऑनलाईन वितरीत केले जाईल, प्रस्तुत निबंध दिलेल्या ईमेल आयडीवर तसेच वरील व्हाट्सअप क्रमांकावर पाठविणे आवश्यक आहे, सदर निबंध मराठी अथवा हिंदी विषयाकरीता देवनागरी लिपीत टाईप करून वा स्वहस्ताक्षरात लिहून पूढीलप्रमाणे दिलेल्या मेल अथवा व्हाट्सअप क्रमांकावर पाठवावे, निबंध स्पर्धेत सहभागी स्पर्धकांनी आपले स्वत:चे अल्पपरिचय नाव शिक्षण व्यवसाय पत्रव्यवहाराचा पत्ता ई-मेल मोबाईल क्रमांक निबंधाच्या पहिल्या पानावर लिहिणे आवश्यक आहे तसेच स्वत:चे पासपोर्ट आकाराचे फोटोही पाठविणे अनिवार्य आहे, सदर विषयाच्या अनुषंगाने लिहिलेले निबंध निबंधात आपल्या स्वत:चे विचार असणे अपेक्षित आहे. निबंध सादर करण्याची शेवटची तारीख २४ नोव्हेंबर २०२० ही आहे.

स्पर्धेत भाग घेण्यासाठी आपले निबंध sanvidhanmaitrisanghasms@gmail.com या मेलवर अथवा ९४०५४३३४६४ ९४०४८४१९९७, ९०४९८०८९०९, या वाटस्अँप क्रमांकावर दिनांक २४ नोव्हेंबर २०२० पर्यत दुपारी १२ वाजेपर्यत पाठवणे आहे. स्पर्धेत प्रवेश पूर्णत: निशुल्क असुन निबंध स्पर्धेत अधिकाधीक संख्येने सहभागी होण्याचे आवाहन संविधान मैत्री संघातर्फे करण्यात आले आहे.

# जनतेला दु:खी होऊ देणार नाही :खा.प्रफुल्ल पटेल

**आमगाव** : शेतकरी व जनसामान्यांचे माझे कौटुंबिक नाते आहे, त्यांच्या आनंदात माझा आनंद आहे म्हणून त्यांना कधी दु:खी होऊ देणार नाही असे प्रतिपादन राज्यसभा सदस्य प्रफुल्ल पटेल यांनी केले.

तालुक्यातील कालीमाटी येथे आयोजित लोकसंवाद कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाला माजी विधान परिषद सदस्य राजेंद्र जैन, राष्ट्रवादीचे प्रदेश सचिव विजय शिवनकर, राजेश भक्तवती, जियालाल पंधरे, सुखराम फुंडे, कविता रहांगडाले उपस्थित होते. पुढे पटेल म्हणाले, गोंदिया, भंडारा जिल्ह्याच्या




विकासासाठी कटिबध्द आहे. शेतकरी हिताकरिता राष्ट्रवादी पक्ष नेहमी अग्रेसर राहला आहे. धान उत्पादक शेतकरी आर्थिकदृष्ट्या कसा सक्षम होईल यासाठी मागील वर्षी प्रमाणे यंदाही धानाला ७०० रुपये बोनस मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले. आगामी जिप, पंचायत समितीच्या निवडणुकीकरिता कार्यकर्त्यांनी एकजुटीने कामाला लागावे, असे आवाहनही पटेल यांनी केले. कार्यक्रमाची प्रस्तावना सुरेश हर्षे यांनी केली. संचालन तालुका अध्यक्ष कमलबापू बहेकार यांनी केले तर आभार संगीता दोनोडे यांनी केले. याप्रसंगी अंजली बिसेन, टिकाराम मेंढे, कविता रहांगडाले, उषा हर्षे, सुखराम फुंडे, प्रमोद शिवणकर, बाबुलाल दोनोडे, तुंडीलाल कटरे, मुक्तानंद पटले, पियुश झा, बाबुलाल दोनोडे, रमन राणे, जयश्री पुंडकर, संजय डोये, चुन्नीलाल सहारे, मोतीराम देशमुख, लखन चुटे, बबलु बिसेन, नामदेव दोनोडे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते

## विधानमंडळ रोहयो समितीच्या अध्यक्षपदी आमदार चंद्रिकापुरे

**गोंदिया:** जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार मनोहरराव चंद्रिकापुरे यांची महाराष्ट्र विधान मंडळ रोजगार हमी योजना समिती प्रमुख पदी निवड झाली आहे.



विधानमंडळ सचिवालयाच्यावतीने ५ नोव्हेंबर रोजी यासंदर्भात पत्र जारी करण्यात आले आहेत. ही समिती महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात सुरु असलेल्या व झालेल्या रोजगार हमी योजनेच्या कामाचा आढावा व चौकशी करते. सोबतच सरकारला योजना राबवितांना काही अडचणी येत असल्यास त्याबद्दलचा अहवाल सादर करते.

# विकास कामांसाठी निधी उपलब्ध करून द्या-आ.कोरोटे

**देवरी:** आमगाव-देवरी विधानसभा क्षेत्र दुर्गम, जंगलव्याप्त, आदिवासी, नक्षलप्रभावीत क्षेत्र आहे. आजही या क्षेत्रात अपेक्षीत विकास झालेला नाही. करीता येथील विकासासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, या आशयाचे निवेदन स्थानिक आमदार सहेषराम कोरोटे यांनी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण यांची मुंबई येथे ४ नोव्हेंबर रोजी भेट घेऊन दिले.



देवरी, आमगाव व सालेकसा तालुक्यातील नवीन रस्त्यांचे बांधकाम, रास्ते खडीकरण, दुरुस्ती, पुल बांधकाम व दुरूस्ती, रस्त्यांचे डांबरीकरण, गावातील सिमेंट काँक्रीट रस्ते, नाली बांधकामच्या प्रास्तावित कामांची यादी संबंधित विभागाकडे सादर करण्यात आली आहे.

वरील बांधकामांसाठी लागणारा निधि उपलब्ध नसल्याने सदर विकास कामात अडथडे येत आहेत. हे अडथडे दूर सारून विकास कामासांठी निधी उपलब्ध व्हावा म्हणून स्थानिक आमदार सहेषराम कोरोटे यांनी मुंबई येथे राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण यांची भेट घेवून क्षेत्रातील विकास कामाबाबद चर्चा करून निधी उपलब्ध करून देण्याची मागणी मागणी केली. प्रसंगी चव्हाण यांनी लवकरच निधी उपलब्ध करून देणार असल्याची ग्वाही कोरोटे यांना दिली.

## सेवानिवृत्त शिक्षक डी.डी. चौरागडेंचा सपत्नीक सत्कार




**गोरेगाव:-** तालुक्यातील परशुराम विद्यालय मोहगाव बु.या शाळेतील जेष्ठ शिक्षक डी.डी.चौरागडे वयोमानानुसार ३१ ऑक्टोंबरला सेवानिवृत्त झाल्याने त्यांचा शाळेच्या व संस्थेच्यावतीने सेवानिवृत्तीपर सपत्नीक सत्कार करण्यात आले.

याप्रसंगी परशुराम शिक्षण प्रसारक संस्था गोरेगावचे सचिव व माजी खासदार खुशालचंद्र बोपचे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. तर मंचावर शिक्षण संस्थेच्या सदस्या सुशिलाताई बोपचे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक जगदिशप्रसाद अग्रवाल, सेवानिवृत्त केंद्रप्रमुख के.टी.पटले, माजी सरपंच हेमलताताई हरिणखेडे, किसनलाल चौहान, एस.बी.पटले. मुख्याध्यापक स्वामी विवेकानंद विद्यालय कारंजा हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

सर्वप्रथम शारदा मातेच्या फोटोचे पूजन करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक बी.डब्लु. कटरे यांनी केले. सेवानिवृत्त होणारे डी.डी. चौरागडे यांचा शाळेचा वतीने शाल, श्रीफळ व स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. सत्कारमुर्तीनी आपले मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी गावातील गणमान्य व्यक्ती, परशुराम विद्यालय मोहगाव बु.व स्वामी विवेकानंद विद्यालय कारंजा येथील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन पी.व्ही. पारधी यांनी तर आभार पी.एम. चुटे यांनी केले. स्नेहभोजन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## भाजपा युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष पदी पुस्तोळे, कापगते

**अर्जुनी मोर** : भारतिय जनता पाटी युवा मोर्चाची जिल्हा कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली. यात होमराज पुस्तोळे व संदिप कापगते यांची जिल्हा कार्यकारिणीच्या उपाध्यक्षपदी निवड झाली आहे. भाजयुमोचे प्रदेशाध्यक्ष विक्रांत पाटील यांच्या सुचनेनुसार भाजपा जिल्हाध्यक्ष केशवराव मानकर, भाजपाचे भंडारा-गोंदिया जिल्हा प्रमुख विरेंद्र अंजनकर यांच्या मार्गदर्शनात भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष ओम कटरे यांनी पुस्तोळे, कापगते यांची नियुक्ती केली आहे. निवडीचे श्रेय माजी मंत्री राजकुमार बडोले, जिल्हाध्यक्ष केशवराव मानकर व युवा मोचार्चे जिल्हाध्यक्ष ओम कटरे यांना दिले आहे.



**डांगोली बॅरेजसाठी प्रयत्नशील : जैन**

**गोंदिया :** खा. प्रफुल्ल पटेल यांच्या सक्षम नेतृत्वात क्षेत्रात अनेक विकासकामे झाली असून अनेक कामे प्रगतीपथावर आहे. डांगोली व परिसरातील सिंचन व पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी वैनगंगा नदीवर बॅरेज तयार करण्यासाठी प्रयत्नशील असून शासनाकडे पाठपुरावा सुरु आहे, असे प्रतिपादन माजी आ. राजेंद्र जैन यांनी केले. ते डांगोली येथे आयोजित कार्यकर्ता सभेत बोलत होते. पुढे बोलताना जैन म्हणाले, ग्रामीण कार्यकर्त्यांच्या समस्या व प्रश्न सोडविण्यासाठी गोंदिया जिल्हा कार्यालयात ग्रामीण कार्यालय सुरु करण्यात आले आहे. तेथे ग्रामीण भागातील समस्याचे समाधान करण्यात येईल. आगामी जिप, पंस व ग्रामपंचायत निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस आपले उमेदवार देणार असून कार्यकर्त्यांनी त्यांना विजयी करण्यासाठी कामाला लागण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. याप्रसंगी गोविंद तुरकर, महिला तालुका अध्यक्ष रजनी गौतम, देवेंद्रनाथ चौबे, ओबीसी तालुका अध्यक्ष सुनील पटले, मानिक पडवार, हनस माने, सुकलाल बाहे, सोविंनद पडवार, जितेंद्र सेंडे, मुकेश माने, आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## पाच महिन्यांपासून मजुरीच्या प्रतीक्षेत मजूर

**सडक अर्जुनी:** तालुक्यातील अर्जुनी वन क्षेत्र अंतर्गत येणाऱ्या बारमाही वन मजुरांना जून ते ऑक्टोबर महिन्यांपर्यंचा त्यांच्या कष्टाचा मोबदला मिळाला नसल्याने त्यांच्यावर आर्थिक विवंचनेला सामोरे जाण्याची वेळ आली आहे. संबंधित वन विभागाने तत्काळ मजुरी अदा करावी, अन्यथा वनक्षेत्र अधिकारी कार्यालयापुढे आंदोलन करण्याचा इशारा वंचित मजुरांनी वनक्षेत्र अधिकारी सडक अर्जुनी यांना दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.

सडक अर्जुनी वन क्षेत्र अंतर्गत अनेक बारमाही मजूर कार्यरत आहेत. या मजुरांना जून, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर या पाच महिन्यांपासूनची मंजुरी देण्यात आलेली नाही. संबंधित अधिकाऱ्यांकडे वारंवार मजुरांनी मजुरीची मागणी केली. परंतु निधी उपलब्ध नसल्याचे कारण पुढे करून वेळ मारून नेण्यात येत आहे. डोंगरगाव आगार येथील वन मजुरांना ऑगस्ट ते ऑक्टोबर या कालावधीचे वेतन मिळालेले नाही. याशिवाय १ जुलै २०२० पासूनचा वाढीव राहणीमान भत्त्याची थकबाकीही देण्यात आलेली नाही. वन मजुरांना ओळखपत्रही देण्यात आलेले नाही. पाच महिन्यांपासून वन मजूरांना मजुरी मिळाली नसल्याने मजुरांसह कुटुंबीयांना आर्थिक विवंचनेला सामोरे जावे लागत आहे. अनेक मजुरांची परिस्थिती हलाखीची असल्याने त्यांच्यावर उपाशी राहण्याची वेळ आली आहे. करिता वन विभागाने तत्काळ बारमाही वन मजरांची मजुरी अदा करावी, अन्यथा या विरोधात आंदोलन करण्याचा इशारा वन मजुरांनी वनक्षेत्र अधिकारी यांना दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे. निवेदनाच्या प्रती उपवनसंरक्षक गोंदिया, वनक्षेत्र अधिकारी डोंगरगाव आगार यांना अग्रेषित करण्यात आले आहे.

## सासरच्यांकडून कुटुंबाला धोका

**गोंदिया:** तिरोडा तालुक्यातील अर्जुनी-मोरगाव उपकेंद्रात कंत्राटी आरोग्य सेविका म्हणून कार्यरत माया सोमप्रकाश बिसेन यांना पती आणि इतर तीन जणांनी ठार मारण्याचा प्रयत्न केला. मुलींना ठार मार, माहेरुन दहा लाख रुपये घेऊन ये, अशी मागणी केली. गळा आवळून खूनाचा प्रयत्न झाला. पोलिसात तक्रार करुन देखील आरोपींना शह देण्यात येत आहे. माझ्या कुटुबियांना सासरच्यांकडून धोका असल्याची तक्रार पीडीत आरोग्यसेविकेने पोलीस अधीक्षकांकडे केली.

माया सोमप्रकाश बिसेन यांचे लग्न २०१ मध्ये झाले. काही दिवस मुल होत नसल्याने पती सोमप्रकाश मारहाण करायचा. त्यानंतर मुलगी झाल्याने तो रागावला. त्यानंतर पुन्हा मुलगी झाल्याने अधिकच रागावात दोन्ही मुलींना ठार मार, माहेरून दहा लाख रुपये घेऊन ये म्हणून भांडण आणि मारहाण करणे सुरु केले.

# शहरात राष्ट्रवादीला बळकट करण्यासाठी कामाला लागावे:राजेंद्र जैन

**गोंदिया:** जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने नेहमीच पुढाकार घेतला आहे. पक्षाचे ध्येय धोरण सर्वांना विकासाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेणार असून शहरात राष्ट्रवादीला बळकट करण्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागावे, असे आवाहन माजी आमदार राजेंद्र जैन यांनी केले. राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने आयोजित सभेत पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना माजी आमदार जैन बोलत होते.

गोंदिया शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक ८ नोव्हेंबर रोजी स्थानिक राष्ट्रवादी भवनात आयोजित करण्यात आली होती. या सभेत नविन कार्यकारिणीचे गठन करण्यात आले. राष्ट्रवादी पक्षाशी युवतींना जोडण्यासाठी शहर युवती अध्यक्ष पदी सायमा खान यांची नियुक्ती करण्यात आली. याप्रसंगी माजी आमदार जैन पुढे म्हणाले, राष्ट्रवादीचे नेते खा.प्रफुल्ल पटेल यांच्या पुढाकाराने शहरातील समस्या मार्गी लावल्या जात आहेत.

वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया - जबलपूर रेल्वे लाईन आदि कामे पूर्णत्वाच्या दिशेने आहेत. याचा निश्चितच लाभ शहरातील जनतेला होणार आहे. त्यामुळे शहरातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी ज्या क्षेत्रात राष्ट्रवादीचा नगरसेवक नाही त्या क्षेत्रात अधिकाधिक लोक व सामाजिक कार्यकर्त्यांना पक्षाशी जोडावे, प्रत्येक वॉर्डामध्ये पोहोचून नागरिकांच्या समस्या



सोडविण्यासाठी पुढाकार घ्यावा, पक्षाची विचारधारा जनमानसात पोहोचविण्यासाठी कामाला लागावे, असे आवाहनही यावेळी जैन यांनी केले.

सभेला देवेंद्रनाथ चौबे, शिव शर्मा, अशोक सहारे, आशा पाटील, राजु एन. जैन, केतन तुरकर, मनोहर वालदे, नानु मुदलियार, बालकृष्ण पटले, राजेश कापसे, वेनेश्वर पंचबुध्दे, नागेंद्रनाथ चौबे, जनकराज गुप्ता, राजेश दवे, विनायक खैरे, दिपक पटेल, मो.खालीद पठान, मयुर दरबार, चंद्रकांत खंडेलवाल, प्रतिक भालेराव, संजीव राय, चंद्रकुमार चुटे, एकनाथ वहिले, सौरभ रोकडे, अक्की अग्रहरी, जिम्मी गुप्ता, राजेश वर्मा, विष्णु शर्मा , प्रितपालसिंग होरा, हरबक्ष गुरनानी, रमन उके, संजीव बापट, नागो बंसोड, महेश तिवारी, मिनू बग्गा, योगेश दर्वे, पुस्तकला माने, एकता मेर्शाम, कुणाल बावनथडे, अजित देशमुख, उमेंद्र गजभिये, थानेंद्रसिंग पवार,दिनेश?वर लाडे, कपिल बावनथडे, निखील बरबटे, चेतन मानकर, निलेश फुलबांधे, दर्पण वानखेडे, इंद्रजीत माने, निरज नागरे, अंकुश गजभिये, आमिर शेख, विशालसिंग ठाकुर, कमलेश बारेवार, सचिन पारधी, महेंद्र हरिनखेडे, गणेश पारधी आदि उपस्थित होते.

**शहर राकाँच्या क्रीडा संघटनेची कार्यकारिणी गठीत**

माजी आमदार राजेंद्र जैन यांच्या हस्ते नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्र देऊन जबाबदारी देण्यात आली. या सभेत जिल्हा राष्ट्रवादी क्रीडा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची घोषणा करून कार्यकारिणी गठीत करण्यात आली.

क्रीडा संघटनेच्या जिल्हाध्यक्ष म्हणून विशालसिंग ठाकुर, सचिव कमलेश बारेवार, उपाध्यक्ष चेतन मानकर, गोंदिया शहर अध्यक्ष निलेश फुलबांधे, गोंदिया तालुकाध्यक्ष अंकुश गजभिये, गोरेगांव तालुकाध्यक्ष गणेश पारधी, गोरेगांव शहर अध्यक्ष आमीर शेख, तिरोडा तालुकाध्यक्ष संगम बावनकर, आमगांव शहर अध्यक्ष टिकेश्वर सोनवाने, आमगांव तालुकाध्यक्ष आकाश पटले, अर्जूनी / मोरगांव तालुकाध्यक्ष धानेंद्र पवार, सालेकसा तालुकाध्यक्ष गोल्डी भाटिया यांची निवड करण्यात आली. सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना माजी आमदार जैन यांच्या हस्ते नियुक्ति पत्र देवून जबाबदारी सोपविण्यात आली.


## ग्राम पंचायत कार्यालय कातुर्ली
### निविदा जाहिरात

ग्राम पंचायत कातुर्ली अंतर्गत प्राथमिक आरोग्य उपकेंद्राकरिता १४ वा वित्त आयोग (आरोग्य) या सदरा खालीलप्रमाणे साहित्य पुरवठा करिता दरपत्रक मागविण्यात येत आहेत. सदर दरपत्रक दिनांक १६/११/२० तारखेपर्यंत दोन बंद लिफाफा पद्धतीने पोष्ट अथवा प्रत्यक्ष सादर करावे. उशीरा आलेल्या दरपत्रकांचा विचार कला जाणार नाही. निविदा उघडण्याची संभाव्य तारीख १८/११/२० स्थळ ग्रा.पं.कार्यालय

| अ.क्र. | साहित्याचे नाव | संभाव्य संख्या | प्रती नग पूर्ण दर जीएसटीसह |
|---|---|---|---|
| १ | हायड्रोलीक बेड ३/६ | २ | -- |
| २ | तीन सिटर चेअर (स्टील) | २ | |
| ३ | गद्दा ३/६ (लेदर कोड) | २ | --- |
| ४ | पॅड डिस्ट्रोज मशीन | १ | ---- |
| ५ | ऑफीस टेबल २/३ | २ | --- |
| ६ | व्हील चेअर करिश्मा | १ | ---- |
| ७ | व्हील चेअर साधी | २ | ---- |
| ८ | प्लास्टीक चेअर | ८ | -- |

अटी व शर्ती:- संबाधातील माहिती ग्राम पंचायतच्या नोटीस बोर्डावर तसेच कार्यालयात उपलब्ध आहे.

सरपंच
ग्राम पंचायत कातुर्ली

ग्रामसेवक
ग्राम पंचायत कातुर्ली

